## एसबीआय लाइफ – स्मार्ट ॲन्युईटी प्लस का?

एसबीआय लाइफ – स्मार्ट ॲन्युईटी प्लस, ह्या इंडिविज्युअल, नॉन–लिंक्ड, नॉन–पार्टिसिपेटिंग, जनरल ॲन्युईटी प्रॉडक्टच्या सहाय्याने जीवनभर आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र व्हा, ज्यामध्ये तुम्हाला निवडीसाठी **तात्काळ** आणि **विलंबित** असे दोन पर्याय दिले जातात. हे प्रॉडक्ट तुम्हाला तुमचे जीवनमान कायम राखायची संधी पुरवते, ज्यामुळे तुमच्या कुटुंबासाठी सुखासमाधानाची खात्री लाभते.

## ठळक वैशिष्ट्ये

- *ॲन्युईटी पर्यायांच्या* विशाल श्रेणीमधून निवडण्याचे स्वातंत्र्य.
- *गॅरंटीड लाइफलॉंग रेग्युलर उत्पन्नाचा* लाभ घ्या.
- *तात्काळ* किंवा *विलंबित* ॲन्युईटी मिळण्याचे पर्याय.
- चक्रवाढी दराने ॲन्युईटीचा लाभ मिळण्याचा पर्याय.
- *मोठ्या प्रीमियमसाठी*[@] *जास्त ॲन्युईटी दराचा* लाभ मिळवा.
- ॲन्युईटी पेआउट्सची वारंवारिता निवडण्याचा पर्याय – *मासिक, तिमाही, सहामाही किंवा वार्षिक.*
- केवळ विशिष्ट ॲन्युईटी पर्यायांमध्येच खरेदीच्या किंमतीच्या किंवा खरेदीच्या किंमतीच्या शिल्लकीच्या परताव्याचा पर्याय उपलब्ध आहे.

[@]तपशीलांसाठी **'उच्च खरेदी मूल्यासाठी उत्तेजना'** हा विभाग पहा.

## पात्रतेचे निकष

| प्रवेशाच्या वेळचे वय* (गेल्या वाढदिवशीचे) | किमान : | कमाल : |
|---|---|---|
| | प्रॉडक्टच्या कन्वर्शनसाठी 0 वर्ष;<br>अन्य सर्व प्रकरणी 30 वर्षे;<br>विलंबित ॲन्युईटी पर्यायांसाठी 45 वर्षे;<br>QROPS प्रकरणी 55 वर्षे. | विलंबित ॲन्युईटी पर्यायांसाठी 75 वर्षे;<br>अन्य सर्व ॲन्युईटी पर्यायांसाठी 95 वर्षे. |
| प्रीमियमची रक्कम | एवढी की ॲन्युईटी पेआउट पद्धतीच्या अनुसार किमान ॲन्युईटी इन्स्टॉलमेंट भरला जाऊ शकेल | मर्यादा नाही |
| ॲन्युईटी पेआउट (प्रति इन्स्टॉलमेंट) | मासिक : ₹1000, । सहामाही : ₹6000<br>तिमाही : ₹3000, । वार्षिक : ₹12,000<br>NPS कॉर्पसच्या रक्कमेमधून खरेदी करणाऱ्या नॅशनल पेन्शन सिस्टिम (NPS) सबस्क्रायबर्ससाठी ॲन्युईटी इन्स्टॉलमेंटचे लोअर लिमिट लागू होणार नाही | मर्यादा नाही |
| प्रीमियम भरण्याची वारंवारिता | सिंगल प्रीमियम | |
| डिफरमेंट पीरियड (फक्त डिफर्ड ॲन्युईटी पर्याय) | 1 ते 10 वर्षे (1 वर्षाच्या पटीत) | |
| ॲन्युईटी पेआउटची पद्धत | मासिक/तिमाही/सहामाही/वार्षिक<br>*(नॅशनल पेन्शन सिस्टिम (NPS) मधील सरकारी क्षेत्रातील सबस्क्रायबर्ससाठी, मासिक पद्धत सक्तीची आहे. अधिक तपशीलांसाठी, कृपया दस्तावेजामध्ये उल्लेख केलेल्या अटी आणि शर्ती वाचा.)* | |
| कर लाभ | ॲन्युईटीज् ह्या भारतातील प्रचलित प्राप्तिकर कायद्याच्या अनुसार करपात्र आहेत, जे वेळोवेळी बदलू शकतात. अधिक तपशीलांसाठी तुम्ही आमच्या वेबसाइटला विजिट करू शकता. | |

**खरेदी जिथे विद्यमान PFRDA मार्गदर्शन प्रणालीच्या अनुसार NPSच्या रकमेतून केलेली असेल तिथे नॅशनल पेन्शन सिस्टिम (NPS) सबस्क्रायबर्सच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी प्रवेशाची वये कमी किंवा जास्त करण्याला अनुमती दिली जाईल.*

**कृपया दखल घ्या :** जिथे रकमा कंपनीद्वारा जारी करण्यात आलेल्या किंवा प्रशासित कॉंट्रॅक्टमधील किंवा सुपरॲन्युएशन स्कीम्सच्या बाबतीत मालक–कर्मचारी प्रकरणातून आलेल्या आहेत, जिथे ॲन्युईटीची खरेदी सक्तीची असेल किंवा सरकारी योजना, कर्मचारी किंवा लाभार्थींना सामावून घेणाऱ्या विशेष स्थितींमध्येच 30 वर्षांपेक्षा कमी वयाचे ॲन्युईटंट्स स्वीकारले जातील.

जॉइंट लाइफ ॲन्युईटीजसाठी वरील सर्व प्रसंगी वयाची मर्यादा दोघांच्या जीवनाला लागू होती. जॉइंट लाइफ ॲन्युईटीजच्या बाबतीत, प्राथमिक आणि दुय्यम जीवनांमधील वयांच्यातील फरक कमाल 30 वर्षे असण्याला अनुमती आहे.

## उपलब्ध असलेले ॲन्युईटी पर्याय

**1. लाइफ ॲन्युईटी (सिंगल लाइफ) :**

- लाइफ ॲन्युईटी (पर्याय 1.1) : ॲन्युईटंटच्या जीवनासाठी सातत्यपूर्ण दराने ॲन्युईटी देय आहे आणि निधनानंतर तात्काळ संपुष्टात येते आणि कॉंट्रॅक्ट खंडित होते.
- लाइफ ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ परचेस प्राइस** (पर्याय 1.2) : ॲन्युईटंटच्या जीवनभर सातत्यपूर्ण दराने ॲन्युईटी देय, जी निधनानंतर संपुष्टात येते आणि नामनिर्देशित व्यक्तीला खरेदीची किंमत परत केली जाते व कॉंट्रॅक्ट खंडित होते.
- लाइफ ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ बॅलन्स परचेस प्राइस# (पर्याय 1.3) : ॲन्युईटंटच्या जीवनभर सातत्यपूर्ण दराने ॲन्युईटी देय. निधनानंतर, खरेदीच्या किंमतीची शिल्लक# (जी खरेदीची किंमत वजा ॲन्युईटंटला अगोदरच काही ॲन्युईटी पेमेंट्स मिळाली असल्यास त्यांची एकूण रक्कम) दिली जाईल. हा बॅलन्स जर पॉझिटिव नसेल तर कोणताही डेथ बेनिफिट देय नाही, सर्व भावी ॲन्युईटी पेआउट्स तात्काळ संपुष्टात येतात आणि पॉलिसी खंडित होते.
- लाइफ ॲन्युईटी विथ ॲन्युअल सिंपल इन्क्रीज ऑफ 3% (पर्याय 1.4) किंवा 5% (पर्याय 1.5) : ॲन्युईटंटच्या जीवनभर वाढती ॲन्युईटी देय आहे, जी निवडलेल्या पयार्याच्या अनुसार, पॉलिसीच्या प्रत्येक पूर्ण वर्षी प्रति वर्ष 3% किंवा 5% सरळ व्याजदराने वाढत जाते. ॲन्युईटंटच्या निधनानंतर, सर्व भावी पेआउट्स तात्काळ संपुष्टात येतात आणि कॉंट्रॅक्ट खंडित होते.
- लाइफ ॲन्युईटी विथ सर्टन पीरियड ऑफ 10 वर्षे (पर्याय 1.6) किंवा 20 वर्षे (पर्याय 1.7) : कार्यान्वित पर्यायाच्या अनुसार, 10 किंवा 20 वर्षांच्या ठरावीक कालावधीसाठी सातत्यपूर्ण दराने ॲन्युईटी देय असते; आणि त्यानंतर ॲन्युईटंटला जीवनभर तीच ॲन्युईटी रक्कम देय असते.
- लाइफ ॲन्युईटी विथ ॲन्युअल कंपाउंड इन्क्रीज ऑफ 3% (पर्याय 1.8) किंवा 5% (पर्याय 1.9) : ॲन्युईटंटच्या जीवनभर वाढती ॲन्युईटी देय आहे, जी निवडलेल्या पर्यायाच्या अनुसार, पॉलिसीच्या प्रत्येक पूर्ण वर्षी प्रति वर्ष 3% किंवा 5% चक्रवाढ व्याजदराने वाढत जाते. ॲन्युईटंटच्या निधनानंतर, सर्व भावी पेआउट्स तात्काळ संपुष्टात येतात आणि कॉंट्रॅक्ट खंडित होते.
- डिफर्ड लाइफ ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ परचेस प्राइस** (पर्याय 1.10) : डिफरमेंट कालावधीच्या अखेरीनंतर ॲन्युईटंटच्या जीवनभर ॲन्युईटी सातत्यपूर्ण दराने देय असते.
  - *डिफरमेंट कालावधीच्या दरम्यान* ॲन्युईटंटचे निधन झाल्यास, नामनिर्देशित व्यक्तीला देय असलेला डेथ बेनिफिट खालीलपैकी जास्त असणारी रक्कम असेल :
    क. खरेदीच्या किंमतीच्या 100% अधिक (+) निधनाच्या तारखेपर्यंत संचयित गॅरंटीड ॲडिशन्स.
    ख. खरेदीच्या किंमतीच्या 105%. आणि सर्व भावी लाभ/ॲन्युईटी पेमेंट्स ताबडतोब संपुष्टात येतील आणि कॉंट्रॅक्ट खंडित होईल.
  - *डिफरमेंट कालावधीच्या नंतर* ॲन्युईटंटचे निधन झाल्यास, नामनिर्देशित व्यक्तीला देय असलेला डेथ बेनिफिट खालीलपैकी जास्त असणारी रक्कम असेल :
    क. खरेदीच्या किंमतीच्या 100% अधिक (+) डिफरमेंट कालावधीच्या दरम्यान संचयित गॅरंटीड ॲडिशन्स वजा (–) ॲन्युईटंटच्या निधनाच्या तारखेपर्यंत भरलेली एकूण ॲन्युईटी.
    ख. खरेदीच्या किंमतीच्या 100%. आणि सर्व भावी लाभ/ॲन्युईटी पेमेंट्स ताबडतोब संपुष्टात येतील आणि कॉंट्रॅक्ट खंडित होईल.
  - जिथे गॅरंटीड ॲडिशन प्रति महिना = पॉलिसी वर्षामध्ये देय असलेली एकूण ॲन्युईटी/12.
  - डिफरमेंट कालावधीच्या दरम्यान पॉलिसीच्या प्रत्येक महिन्याच्या अखेरीस संचयित गॅरंटीड ॲडिशन्स.

**2. जॉइंट लाइफ ॲन्युईटी (टू लाइफ) :**

- लाइफ ॲंड लास्ट सर्व्हायवर 100% ॲन्युईटी (पर्याय 2.1) : प्राथमिक ॲन्युईटंट जिवंत असेपर्यंत सातत्यपूर्ण दराने ॲन्युईटी देय आहे. प्राथमिक ॲन्युईटंटच्या निधनानंतर, हयात असणाऱ्या दुसऱ्या ॲन्युईटंटला शेवटच्या ॲन्युईटी पेआउटच्या 100% तहहयात मिळत राहील. शेवटच्या हयात व्यक्तीच्या निधनानंतर, ॲन्युईटी पेआउट्स ताबडतोब संपुष्टात येतील आणि कॉंट्रॅक्ट खंडित होईल. दुय्यम ॲन्युईटंटचे निधन जर प्राथमिक ॲन्युईटंटच्या आधी झाले, तर प्राथमिक ॲन्युईटंटच्या निधनानंतर काहीही देय नसेल आणि कॉंट्रॅक्ट खंडित होईल.
- लाइफ ॲंड लास्ट सर्व्हायवर 100% ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ परचेस प्राइस** (पर्याय 2.2) : प्राथमिक ॲन्युईटंट जिवंत असेपर्यंत सातत्यपूर्ण दराने ॲन्युईटी देय आहे. प्राथमिक ॲन्युईटंटच्या निधनानंतर, हयात असणाऱ्या दुसऱ्या ॲन्युईटंटला शेवटच्या ॲन्युईटी पेआउटच्या 100% मिळत राहील. शेवटच्या हयात व्यक्तीच्या निधनानंतर, ॲन्युईटी पेआउट्स ताबडतोब संपुष्टात येतील आणि कॉंट्रॅक्ट खंडित होईल.
- डिफर्ड लाइफ ॲंड लास्ट सर्व्हायवर ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ परचेस प्राइस** (पर्याय 2.3)
  - डिफरमेंट कालावधीच्या अखेरीनंतर प्राथमिक ॲन्युईटंट जिवंत असेपर्यंत ॲन्युईटी सातत्यपूर्ण दराने देय असते.
  - प्राथमिक ॲन्युईटंटच्या निधनानंतर, दुसऱ्या ॲन्युईटंटला (त्यावेळी हयात असल्यास) लाइफ ॲन्युईटी मिळेल, जी निवड केली असेल त्यानुसार, प्राथमिक ॲन्युईटंटला दिलेल्या शेवटच्या ॲन्युईटी रकमेच्या 100% असेल. दुसऱ्या ॲन्युईटंटचे निधन जर प्राथमिक ॲन्युईटंटच्या आधी झाले, तर प्राथमिक ॲन्युईटंटच्या निधनानंतर ॲन्युईटी पेमेंट्स संपुष्टात येतील.
  - *डिफरमेंट कालावधीच्या दरम्यान* शेवटच्या हयात व्यक्तीचे निधन झाल्यास, नामनिर्देशित व्यक्तीला देय असलेला डेथ बेनिफिट खालीलपैकी जास्त असणारी रक्कम असेल :
    क. खरेदीच्या किंमतीच्या 100% अधिक (+) निधनाच्या तारखेपर्यंत संचयित गॅरंटीड ॲडिशन्स.
    ख. खरेदीच्या किंमतीच्या 105%. आणि सर्व भावी लाभ/ॲन्युईटी पेमेंट्स ताबडतोब संपुष्टात येतील आणि कॉंट्रॅक्ट खंडित होईल.

- *डिफरमेंट कालावधी संपल्यानंतर* शेवटच्या हयात व्यक्तीचे निधन झाल्यास, नामनिर्देशित व्यक्तीला देय असलेला डेथ बेनिफिट खालीलपैकी जास्त असणारी रक्कम असेल :
  क. खरेदीच्या किंमतीच्या 100% अधिक (+) डिफरमेंट कालावधीच्या दरम्यान संचयित गॅरंटीड ॲडिशन्स वजा (–) शेवटच्या हयात व्यक्तीच्या निधनाच्या तारखेपर्यंत भरलेली एकूण ॲन्युईटी.
  ख. खरेदीच्या किंमतीच्या 100%. आणि सर्व भावी लाभ/ॲन्युईटी पेमेंट्स ताबडतोब संपुष्टात येतील आणि कॉंट्रॅक्ट खंडित होईल.
- जिथे गॅरंटीड ॲडिशन प्रति महिना = पॉलिसी वर्षामध्ये देय असलेली एकूण ॲन्युईटी/12.
- डिफरमेंट कालावधीच्या दरम्यान पॉलिसीच्या प्रत्येक महिन्याच्या अखेरीस संचयित गॅरंटीड ॲडिशन्स.

**3. NPS-फॅमिली इन्कम (पर्याय 2.4) (केवळ NPS सबस्क्रायबर्ससाठीच उपलब्ध) :** ह्यासंबंधी अधिक तपशीलांसाठी कृपया आमच्या वेबसाइटला भेट द्या.

**खरेदीची किंमत ह्याचा अर्थ पॉलिसीमधील प्रीमियम (लागू कर, असल्यास अन्य काही लेव्हीज् वगळून) असा राहील.

#बॅलन्स खरेदीची किंमत = प्रीमियम (लागू कर, असल्यास अन्य काही लेव्हीज् वगळून) वजा संबंधित तारखेपर्यंत केलेले ॲन्युईटी पेआउट्स. ही रक्कम उणे असल्यास, कोणताही डेथ बेनिफिट देय नसेल.

## इमिडिएट ॲन्युईटी बेनिफिट्सचे नमुना उदाहरण

| वार्षिक ॲन्युईटी पेआऊट @ वय-₹10 लाखांच्या खरेदीच्या किंमतीसाठी 60 वर्षे (लागू कर वगळता) | | | | |
|---|---|---|---|---|
| पर्याय नंबर | ॲन्युईटी पर्याय | ॲन्युईटीची वार्षिक रक्कम | खरेदीच्या किंमतीच्या % स्वरूपात ॲन्युईटी रक्कम | डेथ बेनिफिट (एका किंवा दोन्ही ॲन्युईटंट्सचे 10व्या वर्षापर्यंत निधन झाले हे अध्याहृत धरून) |
| 1.1 | लाइफ ॲन्युईटी | 74,898 | 7.49% | शून्य |
| 1.2 | लाइफ ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ परचेस प्राइस | 60,215 | 6.02% | 10,00,000 |
| 1.3 | लाइफ ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ बॅलन्स परचेस प्राइस | 72,699 | 7.27% | खरेदीची किंमत वजा ॲन्युईटंटच्या निधनापर्यंत भरलेली ॲन्युईटंटची एकूण रक्कम |
| 1.4 | लाइफ ॲन्युईटी विथ ॲन्युअल सिंपल इन्क्रीज ऑफ 3% प्रति वर्ष | 56,908 | 5.69% | शून्य |
| 1.5 | लाइफ ॲन्युईटी विथ ॲन्युअल सिंपल इन्क्रीज ऑफ 5% प्रति वर्ष | 49,078 | 4.91% | शून्य |
| 1.6 | लाइफ ॲन्युईटी विथ सर्टन पीरियड ऑफ 10 वर्षे | 74,045 | 7.40% | शून्य |
| 1.7 | लाइफ ॲन्युईटी विथ सर्टन पीरियड ऑफ 20 वर्षे | 71,815 | 7.18% | शून्य |
| 1.8 | लाइफ ॲन्युईटी विथ ॲन्युअल कंपाउंड इन्क्रीज ऑफ 3% प्रति वर्ष | 52,522 | 5.25% | शून्य |
| 1.9 | लाइफ ॲन्युईटी विथ ॲन्युअल कंपाउंड इन्क्रीज ऑफ 2% प्रति वर्ष | 39,534 | 3.95% | शून्य |
| 2.1 | लाइफ ॲंड लास्ट सर्व्हायवर* 100% ॲन्युईटी | 67,788 | 6.78% | शून्य |
| 2.2 | लाइफ ॲंड लास्ट सर्व्हायवर* 100% ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ परचेस प्राइस | 59,968 | 6.00% | 10,00,000 |

*जॉइंट लाइफ पर्यायासाठी दोन्ही ॲन्युईटंट्स समान वयाचे विचारात घेऊन

## डिफर्ड ॲन्युईटी बेनिफिट्सचे नमुना उदाहरण

| डिफर्ड ॲन्युईटी पेआऊट @ वय – ₹10 लाखांच्या खरेदीच्या किंमतीसाठी 60 वर्षे (लागू कर वगळता) | | | | |
|---|---|---|---|---|
| पर्याय नंबर | ॲन्युईटी पर्याय | ॲन्युईटीची वार्षिक रक्कम | खरेदीच्या किंमतीच्या % स्वरूपात ॲन्युईटी रक्कम | डेथ बेनिफिट (एका किंवा दोन्ही ॲन्युईटंट्सचे 10व्या वर्षापर्यंत निधन झाले हे अध्याहृत धरून) |
| 1.10 | डिफर्ड लाइफ ॲन्युईटी, खरेदीच्या किंमतीच्या परताव्यासह (10 वर्षांचा डिफरमेंट कालावधी) | 1,13,727 | 11.37% | 10,00,000 |
| 2.3 | डिफर्ड लाइफ अँड लास्ट सर्व्हायवर* ॲन्युईटी, खरेदीच्या किंमतीच्या परताव्यासह (10 वर्षांचा डिफरमेंट कालावधी) | 1,09,668 | 10.97% | 10,00,000 |

*जॉइंट लाइफ पर्यायासाठी दोन्ही ॲन्युईटंट्स समान वयाचे विचारात घेऊन

## सवलतीस प्रतिबंध

**वेळोवेळी सुधारणा केलेल्या विमा अधिनियम 1938चे कलम 41 असे नमूद करते की :**

क) भारतातील जीवन वा मालमत्ता ह्यांच्याशी संबंधित कोणत्याही जोखमीच्या संदर्भात विमा घेण्यासाठी वा त्याचे नूतनीकरण करण्यासाठी वा तो सुरू ठेवण्यासाठी कुणीही व्यक्ती विमाप्रदात्याद्वारे प्रकाशित केलेल्या माहिती पत्रक किंवा तक्त्यानुसार अनुमती देण्यात असलेली सूट वगळता, तिला देय असलेल्या पूर्ण वा अंशत: कमिशनची कोणतीही सूट कुणाही व्यक्तीला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आमिष स्वरूपात देऊ शकत नाही व देण्याची ऑफर दाखवू शकत नाही किंवा पॉलिसी घेणारी वा तिचे नूतनीकरण करणारी किंवा ती सुरू ठेवणारी कुणीही व्यक्ती कोणतीही सूट स्वीकारूही शकत नाही.

ख) ह्या विभागाच्या तरतुदींची पूर्तता करण्यामध्ये कुणाही व्यक्तीने हयगय केल्यास त्याला/तिला दंड होऊ शकतो, ज्याची रक्कम दहा लाखांपर्यंत विस्तारित होऊ शकते.

**Toll-free No.:** 1800 267 9090 | SMS **'LIBERATE'** to 56161 | **Email:** info@sbilife.co.in | **Web:** www.sbilife.co.in
(Between 9.00 am & 9.00 pm)

एसबीआय लाइफ – स्मार्ट ॲन्युईटी प्लस, हे एक इंडिविज्युअल, नॉन-लिंक्ड, नॉन-पार्टिसिपेटिंग, जनरल ॲन्युईटी उत्पादन आहे.

**बनावट फोन कॉल्स आणि खोट्यानाट्या/फसव्या ऑफर्सपासून सावधान :**
विमा पॉलिसींची विक्री, बोनसची घोषणा किंवा प्रीमियमची गुंतवणूक यासारख्या उपक्रमांमध्ये IRDAI सहभागी नाही. ज्या लोकांना अशा प्रकारचे फोन कॉल्स येतील त्यांना पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याची विनंती करण्यात येते.

विक्री व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी जोखमीचे घटक, अटी आणि शर्ती यांच्या अधिक तपशीलांसाठी कृपया विक्री माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचा. ॲन्युईटी बेनिफिट्स हे आणि ॲन्युईटंटने निवडलेले ॲन्युईटी पर्याय आणि ॲन्युईटी भरण्याची पद्धत ह्यावर अवलंबून असतील आणि ॲन्युईटीच्या खरेदीच्या वेळी असलेले प्रचलित ॲन्युईटी दर, ॲन्युईटंट्स द्वारा चुकते केले जातील. वर प्रदर्शित ट्रेड लोगो स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मालकीचा आहे व परवान्याअंतर्गत एसबीआय लाइफद्वारे वापरला गेला आहे. एसबीआय लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय : नटराज, एम. व्ही. रोड आणि वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जंक्शन, अंधेरी (पूर्व), मुंबई-400 069. **IRDAI रजिस्ट्रेशन नं. 111** I CIN : L99999MH2000PLC129113.

NW/2W/ver1/05/22/SP/MAR